**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**क्रमांक** : गौखनि-१०/०८१२/प्र.क्र. ६१३/ख
महसूल व वन विभाग
हैद्राबाद हाऊस ,
शिबीर कार्यालय नागपूर
दिनांक : १२.१२.२०१३

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी.

**विषय** :- महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अनुसार कार्यवाही करण्याबाबत....

**संदर्भ** : शासन अधिसूचना समक्रमांक दि.१८ .०७.२०१३ व दि. २४.१०.२०१३

संदर्भाधीन दिनांक १८.७.२०१३ च्या शासन अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र गौण खनिज उत्खन्न (विकास व विनियमन) नियम, २०१३" प्रसिध्द करण्यात आले असून ते दिनांक २४.१०.२०१३ च्या अधिसूचनेन्वये राज्यात दिनांक २४.१०.२०१३ पासून लागू करण्यात आले आहेत. राज्यात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी गौण खनिजाची आवश्यकता व पारंपारिक व्यावसायिकांच्या समोर रोजगार विषयक निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेऊन नियमात विशिष्ट कालावधी व विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट परिमाणाइतके गौण खनिजाचे उत्खनन करण्यास परवानगी देण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. मात्र, असे परवाने देतांना राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडून अनुमती आवश्यक आहे काय अशी पृच्छा काही क्षेत्रीय कार्यालयाकडून करण्यात आली होती.

२. "महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३" मधील प्रकरण ४ मध्ये परवान्यासाठी राज्यस्तरीय समितीकडून पर्यावरण अनुमती घेण्याबाबतची तरतूद नाही. तथापि, त्यादृष्टीने स्पष्टिकरण करण्यासाठी सदर बाब दिनांक १२.१२.२०१३ रोजी मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती. सदर बैठकीत मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे स्पष्टिकरण करण्यात येत आहे :-

"महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३" मधील प्रकरण ४ अनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी तात्पुरते गौण खनिज उत्खनन परवाने देण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे तात्पुरते गौण खनिज उत्खनन परवाने देण्याकरीता पर्यावरण अनुमतीची आवश्यकता राहणार नाही".

३. वरील स्पष्टिकरण वाळू / रेती उत्खननासाठी लागू होणार नाही. वाळू/रेती निर्गतीसाठी उक्त नियमाच्या प्रकरण ५ तसेच शासन निर्णय क्रमांक : गौखनि-१०/०५१२/प.क्र. ३००/ख, दिनांक १२.०३.२०१३ मधील तरतुदीनुसार पर्यावरण अनुमती घेणे अनिवार्य राहील.

४. उक्त परवान्यांचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, त्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा जिल्हास्तरीय अधिकारी, उपवनसंरक्षक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा जिल्हास्तरीय अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचा सामावेश करण्यात आला आहे. सदर समिती उक्त नियमातील तरतुदींचे काटेकोर पालन होत आहे, याबाबत आवश्यक काळजी घेणार आहे. तरी "महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३" अनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने गौण खनिज उत्खननाकरिता गौण खनिजाचे खाण परवाने देण्याची कार्यवाही विनाविलंब सुरू करावी.

मा.आ.गुट्टे

**(मा. आ. गुट्टे)**
**उप सचिव**

प्रत,

प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.